आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in    मंगळवार दिनांक 30/06/2026    METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 144 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# पिंपरी-चिंचवडमधील 'रेड झोन' प्रश्नावर महिनाभरात समन्वय समिती

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे 32 लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न विधानसभेत चर्चेत आला. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी आज विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय (Public Distribution System - PDS) स्थापन करण्याची तसेच शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक (Quota) मंजूर करण्याची जोरदार मागणी केली आहे.**



मुंबई येथील विधानभवन येथे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. यावेळी आमदार लांडगे यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, पिंपरी-चिंचवड हे राज्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे औद्योगिक आणि नागरी शहर असून, मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार व वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, शहरातील संपूर्ण अन्नधान्य वितरणाचे नियोजन आणि प्रशासकीय कामकाज आजही पुणे शहरातील कार्यालयामार्फत केले जात असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अन्नधान्याचे वेळेवर वितरण, नवीन लाभार्थ्यांची नोंदणी, शिधापत्रिकांमधील दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे किंवा वगळणे, तक्रार निवारण, इष्टांक वाटप यासह विविध प्रशासकीय कामांमध्ये मोठा विलंब होत असून, त्याचा फटका पात्र व गरजू लाभार्थ्यांना बसत आहे. आमदार लांडगे यांनी सरकारकडे पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाला प्रशासकीय मान्यता देण्याबरोबरच आवश्यक पदनिर्मिती करण्याची मागणी केली. तसेच शहराच्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक मंजूर करून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यासोबतच ई-राशन कार्ड, ऑनलाइन सेवा, लाभार्थी पडताळणी, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि वितरण व्यवस्थेवर स्थानिक स्तरावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कार्यालय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. आमदार लांडगे यांनी हा विषय लाखो नागरिकांच्या अन्नसुरक्षेशी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी आणि जनहिताशी संबंधित असल्याने शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी केली.

> " पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेता स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय ही काळाची गरज आहे. स्थानिक पातळीवर सक्षम यंत्रणा उभी राहिल्यास लाभार्थ्यांना वेळेवर सेवा मिळेल, वितरण व्यवस्थेत पारदर्शकता वाढेल आणि लाखो नागरिकांची अन्नसुरक्षा अधिक प्रभावीपणे सुनिश्चित होईल. शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे.
>
> **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिं.चिं. पुणे

# 'संघर्ष' हाच भाजपचा डीएनए; आमदार श्रीकांत भारतीय यांनी उलगडला आणीबाणीचा थरारक इतिहास!

**25 जून 1975 रोजी लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या आणीबाणीच्या काळ्या कालखंडाला 51 वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर, निगडीतील ग. दि. माडगूळकर सभागृहात भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित 'लोकशाही रक्षक पुरस्कार' सोहळ्यात आणीबाणीच्या काळातील संघर्षाचा इतिहास पुन्हा एकदा जिवंत झाला.**




आमदार श्रीकांत भारतीय यांनी आपल्या ओघवत्या भाषणातून कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला. हा कार्यक्रम केवळ एक सोहळा नसून नव्या पिढीसाठी संघर्षाचा दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. भारतीय जनता पक्षाचा उदय हा आणीबाणीच्या काळात लोकांनी दिलेल्या असीम समर्पणातून झाला असून, 'संघर्ष' हा आमच्या पक्षाचा डीएनए (DNA) आहे, असे ते ठामपणे म्हणाले. इतिहास हा केवळ डोक्याने वाचायचा नसून तो हृदयाने समजून घ्यायचा असतो, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना लोकशाहीसाठी दिलेल्या बलिदानाची जाणीव करून दिली आणि आपापसातील समन्वय वाढवण्याचे आवाहन केले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी आणीबाणीच्या काळातील भीषण आठवणींना उजाळा देत तत्कालीन काँग्रेस सरकारवर जोरदार हल्ला चढवला. हा भारताच्या इतिहासातील सर्वात काळा दिवस होता, ज्या दिवशी जनतेचे मूलभूत अधिकार हिरावून घेतले गेले होते.

मात्र, अनेक राष्ट्रभक्तांनी तुरुंगवास सोसला आणि अमानुष छळ सहन केला, परंतु हुकूमशाहीसमोर गुडघे टेकले नाहीत. त्यांच्या याच त्यागामुळे आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेत आहोत, असे ते म्हणाले.या सोहळ्यात आणीबाणीत सत्याग्रह करणाऱ्या आणि मिसा (M I S A) कायद्यांतर्गत जेल भोगणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा आमदार श्रीकांत भारतीय यांच्याहस्ते 'लोकशाही रक्षक पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सभागृहात उपस्थित अनेकांचे डोळे पाणावले होते.या कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन भाजपा संघठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांनी केले.या कार्यक्रमास आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार शंकर जगताप, मा. आमदार अश्विनीताई जगताप, संयोजक संगठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, जेष्ठ नेते मधू जोशी, आणीबाणी सत्याग्रही संघटनेचे आबा खांबे, माजी अध्यक्ष डॉ.बाळकृष्ण नाईक, युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, माजी विरोधी पक्षनेत्या डॉ.गिताताई आफळे, मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडये, संजय पटनी, संतोष तापकीर, कैलास सानप, अजय पाताडे, पोपट हजारे, राजू दुर्गे, देवदत्त लांडे, अजित कुलथे, नंदू भोगले, यांच्यासह सर्व मोर्चे, आघाडी व प्रकोष्ठ यांचे अध्यक्ष, सर्व मंडल अध्यक्ष अनेक पदाधिकारी, विविध आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष, आजी-माजी नगरसेवक, शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'भारत माता की जय' आणि 'लोकशाही अमर रहे' अशा घोषणांनी संपूर्ण सभागृह दणाणून गेले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे तर सूत्रसंचालन देवदत्त भिंगारकर यांनी केले आणि आभार कार्यक्रमाचे संयोजक मोरेश्वर शेडगे यांनी मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 30/06/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# नगरसेवक धर्मपाल तंतपाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक धर्मपाल यशवंतराव तंतपाळे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि. 5 जुलै) विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन शिंदे पेट्रोल पंपासमोरील लष्का फार्म (पद्मावती गार्डन), किवळे येथे करण्यात आले आहे.**

वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देत दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, डॉक्टर, सीए आणि वकिलांचा गौरव, गरजू महिलांना आर्थिक मदत, तसेच सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोट व छत्री वाटप, घरगुती वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला आमदार शंकर जगताप, आमदार महेश दादा लांडगे, विधान परिषदेचे आमदारअमित गोरखे, उमाताई खापरे, महापौर रवी लांडगे, अल्पसंख्यांक माजी अध्यक्ष हाजी अराफत, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महानगरपालिका आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

समाजहिताच्या उपक्रमांद्वारे वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत होत असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.




# आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**जगद्गुरु संत तुकाराम महाराज संत पीठ आणि अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धा व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यास ज्येष्ठ नेते व खासदार शरद पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**



यावेळी मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, प्रसिद्ध उद्योजक संतोष बारणे, सुप्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते तसेच विविध लोकप्रतिनिधी, संत पिठाचे संचालक, प्राध्यापक, शिक्षकवृंद आणि संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेत विविध राज्यांतील तसेच परदेशातील स्पर्धकांनी सहभाग घेत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. गुणवंत स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

संगीत कला, संस्कृती आणि परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमास संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 30/06/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# लोककलावंतांना राजाश्रयाची गरज; समरसता लोककला संमेलनामध्ये लोककलावंतांची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**महाराष्ट्रामध्ये शेकडो वर्षांपासून लावणी, तमाशा, गवळण ,भारुड ,पोवाडा आदी विविध प्रकारच्या लोककला सादर होत आहेत. या लोककलांनी महाराष्ट्राचे जगणे आणि संस्कृती समृद्ध केले आहेत. या लोककला महाराष्ट्राची ओळख आणि वैभव झाले आहेत परंतु या कला सादर करणारे लोककलावंत मात्र अद्याप अनेक समस्यांना तोंड देत आहेत. लोककलावंत टिकले तरच खऱ्या अर्थाने लोककला टिकेल लोककलावंतांना आधार देण्यासाठी लोकांच्या पाठिंबाबरोबरच सरकारने आधार देऊन त्यांना राजश्रय देण्याची गरज आहे असे मत ज्येष्ठ लोककलावंतांनी केली.**



महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय आणि समरसता साहित्य परिषदेतर्फे पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या समरसता लोककला संमेलनामध्ये जेष्ठ लोककलावंतांनी आपली भावना व्यक्त केली . ज्येष्ठ नृत्यांगना मंगला बनसोडे, सुरेखा पुणेकर, ज्येष्ठ गायक नंदेश उमप , जयमला इनामदार, पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रचे प्रमुख प्रवीण भोळे आदी चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते. प्रसन्न पाटील, धनंजय खुडे, निलेश गद्रे आदी यावेळी उपस्थित होते , अक्षय मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

रघुवीर खेडकर म्हणाले, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये पन्नास वर्षांपूर्वी आम्ही लोककला जपली आणि ती समृद्ध केले. पूर्वी तमाशाचे शंभर परंतु संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आता तमाशाचे केवळ दहा ते बारा फड राहिले आहेत लोककला या लोककलावंतांमुळे टिकले आहेत परंतु लोककलावंत जर आर्थिक अडचणीत असेल तर तो किती वर्ष लोककला आत्मसात करू शकतो त्यामुळे लोककला टिकण्यासाठी सरकारने लोककलावंतांना आधार देण्याची गरज आहे.

मंगला बनसोडे म्हणाल्या, जनतेने माझ्या कलेला कायम दाद दिल्या जनतेच्या प्रेमामुळेच मी आज इथपर्यंत येऊ शकले. प्रेक्षकांनी मला जर प्रेम दिले नसते तर मी हा प्रवास करू शकले नसते. त्यामुळे प्रेक्षकांनी दिलेल्या प्रेमासाठी मी त्यांची आयुष्यभर ऋणी राहणार आहे.सुरेखा पुणेकर म्हणाल्या लोककलावंतांच्या समस्या सरकार पुढे मांडण्याची गरज आहे परंतु सरकारच्या या संमेलनामध्येच स्वतः सरकारचे प्रतिनिधी उपस्थित राहिले नाहीत हा एक प्रकारे लोककलावंतांचा अपमान आहे. लोककलावंतांच्या समस्या सरकारने ऐकून घेतल्या नाहीत तर त्या कशा सुटतील. गेल्या अनेक वर्षांपासून लोककलावंत समस्यांशी संघर्ष करत आहेत. या समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी लोक कलावंतांनी एकत्र येण्याची गरज आहे.

नंदेश उमप म्हणाले, लोककलावंतांनी आपली एकजूट दाखवून दिली पाहिजे. आपण जर एकत्र येऊन येऊन सरकार समोर आपल्या मागण्या मांडल्या तर त्या मागण्या निश्चितच मान्य होतील. मी शासन कमिटीचा सदस्य म्हणून लोककलावंतांच्या अनेक मागण्या आतापर्यंत सरकारसमोर मांडले आहेत आणि त्यापैकी अनेक मागण्या मान्य देखील झाल्या आहेत.

प्रवीण भोळे म्हणाले ज्या लोककलावंतांनी शेकडो वर्ष महाराष्ट्राच्या मनोरंजन केले परंतु समाजाने त्यांच्या पदरी काय टाकले हा विचार करण्याची गरज आहे. आज डिजिटलच्या युगामध्ये रंगमंचावरील कला नष्ट होत असताना लोक कलावंत एखाद्या अर्थाने हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा जपत आहेत यासाठी आपण त्यांचे आभार मानले पाहिजे त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होण्यासाठी ज्या योजना आवश्यक आहेत त्या योजना लागू करून लोककलावंतांना पुन्हा एकदा सोन्याचे दिवस यावितीयासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजे.

जितेंद्र वाईकर यांनी सूत्रसंचालन केले.

# पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे 32 लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न विधानसभेत चर्चेत आला. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी आज विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय (Public Distribution System - PDS) स्थापन करण्याची तसेच शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक (Quota) मंजूर करण्याची जोरदार मागणी केली आहे.**



मुंबई येथील विधानभवन येथे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. यावेळी आमदार लांडगे यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, पिंपरी-चिंचवड हे राज्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे औद्योगिक आणि नागरी शहर असून, मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार व वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, शहरातील संपूर्ण अन्नधान्य वितरणाचे नियोजन आणि प्रशासकीय कामकाज आजही पुणे शहरातील कार्यालयामार्फत केले जात असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.अन्नधान्याचे वेळेवर वितरण, नवीन लाभार्थ्यांची नोंदणी, शिधापत्रिकांमधील दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे किंवा वगळणे, तक्रार निवारण, इष्टांक वाटप यासह विविध प्रशासकीय कामांमध्ये मोठा विलंब होत असून, त्याचा फटका पात्र व गरजू लाभार्थ्यांना बसत आहे. आमदार लांडगे यांनी सरकारकडे पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाला प्रशासकीय मान्यता देण्याबरोबर आवश्यक पदनिर्मिती करण्याची मागणी केली.

तसेच शहराच्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक मंजूर करून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.यासोबतच ई-राशन कार्ड, ऑनलाइन सेवा, लाभार्थी पडताळणी, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि वितरण व्यवस्थेवर स्थानिक स्तरावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कार्यालय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. आमदार लांडगे यांनी हा विषय लाखो नागरिकांच्या अन्नसुरक्षेशी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी आणि जनहिताशी संबंधित असल्याने शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 30/06/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# सांगवीतील सरकार सेतू पुलाच्या सुशोभीकरणात तब्बल 17 कोटींच्या खर्चावर संशय

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**सांगवी येथील सरकार सेतू पुलावरील रोषणाई आणि सुशोभीकरण कामामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार करत या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक चौकशी करण्याची मागणी केली आहे.**



विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून प्राप्त माहितीत पुलाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात एम.एस. (MS) साहित्य वापरल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष पाहणीत पुलावरील लोखंडी साहित्याचे प्रमाण अधिकृत नोंदीपेक्षा लक्षणीय कमी असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पुलावरील लोखंडी साहित्याचे प्रत्यक्ष वजन सुमारे 50 मेट्रिक टनांच्या आसपास असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, डीएसआर दरानुसार साहित्य, फॅब्रिकेशन आणि इतर पूरक खर्च मिळून संपूर्ण प्रकल्पाचा खर्च जास्तीत जास्त पाच कोटी रुपयांपर्यंत अपेक्षित असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, या कामावर सुमारे 22 कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती समोर आल्याने सुमारे 17 कोटी रुपयांच्या खर्चाबाबत गंभीर संशय निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर भाऊसाहेब भोईर यांनी संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक समितीकडून प्रत्यक्ष मोजमाप व साहित्य पडताळणी, स्वतंत्र आर्थिक लेखापरीक्षण (ऑडिट) तसेच अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका (MB), बिले, देयके आणि मंजुरी आदेशांची सखोल तपासणी करण्याची मागणी केली आहे.

सार्वजनिक निधीशी संबंधित हे प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे असल्याने महापालिका प्रशासनाने यामध्ये तातडीने चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# राज्यातील बेकायदेशीर वृक्षतोडीचा मुद्दा विधान परिषदेतआमदार अमित गोरखे यांच्या तारांकित प्रश्नावर वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली महत्त्वपूर्ण माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई | राज्यातील वनसंपत्तीचे संरक्षण, बेकायदेशीर वृक्षतोडीला आळा, वनमाफियांविरोधातील कारवाई आणि वन विभागाची कार्यक्षमता या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर भारतीय जनता पक्षाचे विधान परिषद सदस्य आमदार अमित गोरखे यांनी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाला उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजना, कारवाई आणि सद्यस्थितीची सविस्तर माहिती सभागृहासमोर मांडली.**




आमदार अमित गोरखे यांनी राज्यातील वाढत्या बेकायदेशीर वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून वनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली. वनमाफियांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच वनसंरक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, रिक्त पदे भरणे आणि प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

***शिवना परिसरातील वृक्षतोडीबाबत शासनाची भूमिका स्पष्ट***

आमदार अमित गोरखे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील शिवना परिसरात झालेल्या कथित वृक्षतोडीबाबत शासनाचे लक्ष वेधले. यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून, चौकशी अहवालानुसार राखीव, संरक्षित अथवा अवर्गीकृत वनक्षेत्रात वृक्षतोड झाल्याचे आढळून आले नसल्याचे स्पष्ट केले.

**अवैध वृक्षतोडीविरोधात कठोर कारवाई***

वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की, राज्यात अवैध वृक्षतोडीच्या प्रकरणांमध्ये संबंधित वनक्षेत्रपाल, वनपाल आणि वनरक्षकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. अधिकारी अथवा कर्मचारी दोषी आढळल्यास विभागीय चौकशी करून आवश्यक ती प्रशासकीय कारवाई केली जात आहे.

***30.14 कोटी रुपयांची वसुली***

अवैध वृक्षतोडीच्या विविध प्रकरणांमध्ये जप्त करण्यात आलेल्या वनउत्पादन आणि मालमत्तेमधून आतापर्यंत सुमारे 30.14 कोटी रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी सभागृहात दिली.

***वनसंरक्षणासाठी आधुनिक आणि प्रभावी उपाययोजना***

वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की, बेकायदेशीर वृक्षतोड रोखण्यासाठी राज्यभर नियमित जंगल गस्त, रात्रीची नाकाबंदी, अचानक धाडी, संशयित वाहनांची तपासणी, अवैध लाकूड वाहतुकीवर नियंत्रण, जनजागृती अभियान आणि तक्रार निवारणासाठी टोल-फ्री सुविधा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

***वन विभागातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू***

वन विभाग अधिक सक्षम करण्यासाठी रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू असून, मनुष्यबळ वाढवून वनसंरक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी शासन आवश्यक ती पावले उचलत असल्याचे वनमंत्र्यांनी स्पष्ट केले.

***वनसंरक्षणासाठी सातत्याने पाठपुरावा***

राज्याची वनसंपत्ती ही पर्यावरणाचा समतोल राखणारी अमूल्य नैसर्गिक संपदा असून तिचे संरक्षण करणे ही शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. वनमाफियांना आळा बसावा, बेकायदेशीर वृक्षतोड पूर्णपणे थांबावी आणि वन विभाग अधिक सक्षम व्हावा या उद्देशाने आमदार अमित गोरखे यांनी हा महत्त्वपूर्ण विषय विधान परिषदेत उपस्थित केला.

या चर्चेमुळे वनसंरक्षणासंदर्भातील विविध उपाययोजनांची माहिती सभागृहासमोर आली असून, पर्यावरण संरक्षण आणि वनसंपत्तीच्या जतनासाठी अशा विषयांचा सातत्याने पाठपुरावा केला जाणार आहे, असे देखील यावेळी आमदार अमित गोरखे यांनी स्पष्ट केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968